# धर्म आणि धर्मग्लानी

धर्म शब्दाचा अर्थ श्रेष्ठ गुणांची धारणा आहे अर्थात धर्मवादी तो आहे जो संस्कारित आहे. कलियुगाच्या शेवटी मनुष्य सदाचारहीन बनतो. नैतिक मूल्य सोडतो, देह-अभिमानी विकारी बनून कुमार्गावार चालू लागतो. यामुळे समाजात अत्याचार, अनाचार, व्यभिचार, हिंसा, चोरी, खोटेपणा, लूट आणि बेईमानी चहूकडे व्याप्त होऊन जाते. समाजात समस्या वाढू लागतात. मानव दुःखी, अशान्त आणि असंतुष्ट राहतो. कोठेच शांति राहात नाही. आज आसुरी आणि तमोगुणी संस्काराचे मनुष्य धन-संपत्तीलाच सर्व काही मानुन बसले आहेत. म्हणून ते ईश्वर आणि देवी-देवतांचा उपहास करु लागतात, ज्याच्या उदाहरणांनी धर्म पुस्तके भरलेली आहेत. मनुष्यांनी पूज्य देवी-देवतांवर कित्येक कलंक लावलेत. कधी ते म्हणतात ब्रम्हाजी आपली पुत्री सरस्वती वर मोहित झाले, कधी म्हणतात, विष्णुजीने वृंदाचा पतिव्रता धर्म नष्ट केला. कधी ते म्हणतात शंकरजी मोहिनीला बघून कामातुर झाले इ. शेवटी या गोष्टी म्हणजे पवित्र देवता आणि दैवी धर्माची ग्लानि नव्हे तर आणखी काय आहे? अर्थात आता कलिकाळाची शेवटची घटका आहे जेव्हा मनुष्य विषय विकारी आणि पतित बनतात. विवेक शून्य होऊन ते देवी देवतांवर दोष लावतात. तेव्हाच या जगाला मुक्तिदाता ईश्वराची आवश्यकता भासते. आणि हाच मूढमति मानवाला ज्ञान देण्याचा योग्य काळ होतो.

त्या अनुसार गीत ज्ञान दाता, दिव्य चक्षू विधाता, परमपिता शिव या धर्म ग्लानिच्या वेळेस जगत कल्याणासाठी आणि गीता ज्ञान देण्यासाठी संसारातील वृध्द आणि अनुभवी शरीराचा आधार घेऊन प्रगट होतात. ज्यास प्रजापिता ब्रम्हा म्हटले जाते. वास्तविक हे प्रजापिता ब्रम्हा कोणी अन्य नसुन श्रीकृष्णाच्या ८४ व्या जन्माचे स्वरुप आहे. जेव्हा ते साधारण मनुष्य तनात मनुष्याच्या रुपात असतात हाच तो काळ आहे जेव्हा मनुष्य अज्ञानवश नीति आणि धर्म सोडतो, त्या विरुध्द कार्य करतो. म्हणून प्रायलुप्त ज्ञान आणि योगाच्या शिक्षणाद्वारे धर्म अर्थात पवित्रता, शान्ति आणि दिव्य गुणांच्या पुर्नस्थापनेचा हा अनुकूल काळ आहे.

अशा प्रकारे जर आपण ''धर्म'' आणि ''धर्मग्लानि'' शब्दांच्या व्याख्येशी सहमत आहोत तर आम्हाला हे देखील स्वीकार करायला पाहिजे कि भगवंताचे अवतरण कूर्म, मत्स्य, वराह इत्यादि रुपात होत नाही आणि ना प्रत्येक युगात ईश्वराला येण्याची आवश्यकता आहे. कारण कि धर्माची अति ग्लानि तर कलियुगाच्या अंती होते. म्हणून आम्हाला हे ही निश्चय पूर्वक मानायला हवे कि गीते मध्ये उद्धृत युगे-युगे शब्दाचा अर्थ ''महायुगे'' अथवा ''कलियुगे'' आहे. आणि हे देखील स्वीकारायला हवे कि, धर्मग्लानिच्या वेळेस कलियुगात होणाऱ्या अवतारास आपण भगवंत म्हणू तेच ''गीता ज्ञान दाता'' आहेत. हे तथ्य स्वीकार केल्यानंतर असे स्वीकार करायला हवे कि परमपिता परमात्म्याचे अवतरण ''प्रजापिता ब्रम्हा'' च्या साधारण मानवी शरीरात झाले होते. कारण कि श्रीकृष्ण सारखे देवता तर कलियुगात असत नाहीत, कलियुगात तर साधारण मनुष्य असतात. जर हे मानले कि गीता ज्ञान परमपिता परमात्मयाने कलियुगाच्या अंती दिले होते, तर गीता ज्ञानी श्रेष्ठता स्वतः स्पष्ट होते. आणि या ज्ञानाला ''श्रृति'' मानायला हवे. ज्यास मनुष्यांनी ''प्रजापिता ब्रम्हा'' च्या मुख कमलाद्वारे ऐकले.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com